दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
सपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२३३ शनिवार,दि.२६ एप्रिल २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-233 | Saturday, Dt.26 April 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# २ मुलींच्या आत्महत्येचा दावा, पण जबाबतही दिली नाही माहिती

## साक्षी कांबळे हिच्या कुटुंबालाआज पुन्हा चौकशीला बोलावले

बीड /प्रतिनिधी

ब्लॅकमेलिंग, छेडछाडीला कंटाळूनशहरातील साक्षी कांबळे या विद्यार्थिनीने धाराशिवमध्ये केलेल्या आत्महत्येनंतरतिच्या आईने अन्य दोन मुलींनीही अशाचप्रकारे आत्महत्या केल्याचा दावा केला होता. मात्र, गुरुवारी कळंबचे डीवायएसपी संजय पवार यांनी नोंदवलेल्या जबाबातही त्यांनी या दोन मुली कोण याची माहिती पोलिसांनादिलेली नाही.

बीड येथील एका महाविद्यालयील साक्षीकांबळे या विद्यार्थिनीला अभिषेक कदमनावाचा तरुण हा छेड काढून त्रास देत होता.या मुलीचा साखरपुडा होऊन २० एप्रिलरोजी विवाह होणार होता. मात्र अभिषेक हातिला ब्लॅकमेल करत होता. याला कंटाळूनतिने २४ मार्च रोजी धाराशिवमध्ये मामाच्याघरी आत्महत्या केली होती. या प्रकरणी गुन्हानोंद होऊन अभिषेकला अटक झाली होती.त्याला जामीनही मिळाला होता. यानंतरमुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांना पत्र लिहून न्यायाची मागणी केली होती.उपसभापती निलम गोऱ्हे यांनीही या मुलीचीभेट घेतली होती. यावेळी मुलीच्या आईनेअन्य दोन मुलींनी आत्महत्या केल्याचा दावाकेला होता तर तपास अधिकारी स्वप्निलराठोड यांच्यावरही आरोप केले होते.त्यानंतर तपास अधिकारी बदलून हा तपासकळंबचे डीवायएसपी संजय पवारयांच्याकडे दिला गेला .पवार यांनी गुरुवारीसाक्षीच्या आईसह ४ जणांचे जबाब नोंदवले.मात्र, यातही त्यांनी त्या दोन मुलीची नावेसांगितली नाहीत.

### जामीन रद्द करण्याचा अर्ज

दरम्यान, साक्षीचे कुटुंब हे अभिषेक कदमयाला मिळालेला जामीन रद्द करण्यात यावायासाठी धाराशिव न्यायालयात अर्ज करणारअसल्याची माहिती सूत्रांनी दिली. शुक्रवारीयासाठी ते न्यायालयात गेले होते. तर शनिवारीडीवायएसपींनी त्यांना पुन्हा चौकशीसाठीबोलावले आहे.


# बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारपासून प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे

## गणित / विज्ञान विषय रूपांतरण मागणी साठी बेमुदत उपोषण

बीड ।प्रतिनिधी

गेल्या आठ महिन्यापासून बीड जिल्हा परिषद मध्ये प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असलेले ७४ भाषा व सामाजिक शास्त्र विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक सेवांतर्गत बीएससी पदवी उत्तीर्ण झाल्याने विषय रूपांतरण ची मागणी करून गणित/ विज्ञान विषय बदलून देण्याचे मागणी करत आहेत .परंतु बीड जिल्हा परिषद मध्ये संबंधितांच्या मागणीची कसल्याही प्रकारे दखल न घेतल्यामुळे संबंधित शिक्षकांनी न्याय मागण्यासाठी सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ४४६१/२०२५ अन्वये दाद मागितली असता उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी दिलेले आदेशान्वये संबंधित शिक्षकांच्या विषय रूपांतरण प्रश्न दोन आठवड्यात मार्गी लावण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाचे आदेशानंतरही जिल्हा परिषद प्रशासनाने त्याची कसली ही दखल घेतली नाही म्हणून संबंधित ७४ प्राथमिक पदवीधर शिक्षक गणित /विज्ञान विषय रूपांतरण मागणी व बदली पोर्टलवर विषय बदल करण्याच्या मागणीसाठी सोमवार दिनांक २८ /४ /२०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसत आहेत.



## सौ नीता रूपडा यांचे निधन

आंबेजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रशांत नगर भागातील मनीष स्वीट होम चे मालक श्रीयुत शशिकांत रुपडा यांच्या पत्नी सौ नीता शशिकांत रुपडा यांचे २४ एप्रिल रोजी सायंकाळी अंबाजोगाई येथे अल्पशा आजाराने निधन झाले .त्या ७५ वर्षांच्या होत्या.त्यांच्या पश्चात त्यांचे पती शशिकांत रुपडा, दोन विवाहित मुले मनीष आणि हरीश रुपडा तसेच तीन विवाहित मुली नातवंडे, पणतू असा मोठा परिवार आहे .त्यांच्या निधनामुळे अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांच्या पार्थिवावर २५ एप्रिल रोजी शुक्रवारी राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले .याप्रसंगी त्यांचे नातेवाईक ,मित्रपरिवार, शहरातील व्यापारी आणि सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.

# विकास बनसोडे खून प्रकरणात आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १४ मार्च २०२५ रोजी होळीच्या सणाला घुमरी पिंपरी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आरोपीने मयत विकास बनसोडे राहणार बोरगाव तारू तालुका भोकरदन जिल्हा जालना यास आरोपीने बोलून घेतले आणि त्यांच्या मुलीचे प्रेम संबंध अनुसूचित जातीच्या विकास बनसोडे सोबत असल्यामुळे स्वतःची प्रतिष्ठा आणि सन्मान धुळीस मिळेल या भीतीने विकास बनसोडे यास १४ मार्च २०२५ च्या संध्याकाळी सहा वाजता ते १५ मार्च २०२५ च्या दुपारी एक वाजेपर्यंत जवळपास वीस तास मारहाण केली. ही मारहाण निरघुण पद्धतीने केली आणि विकास बनसोडे चा निर्गुण खून जातीय दोष भावनेने झालेला आहे.



मयत विकास बनसोडे चा भाऊ आकाश बनसोडे यांनी दिनांक १६ मार्च २०२५ रोजी आष्टी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आठ पुरुष आणि दोन महिला सह दहावी हत्याचा गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच ट्रॉसिटी क्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आष्टी पोलिसांनी आरोपीस तात्काळ अटक करून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत दहा रुपये पैकी आठ पुरुष आणि दोन महिला आरोपी आहेत दोन महिला आरोपी स्वाती भाऊसाहेब शिरसागर आणि सुवर्णा बाबासाहेब शिरसागर यांनी जामीन अतिरिक्त सत्र न्यायालय बीड येथे दाखल केला होता या महिलाचा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही त्यांनी फक्त मताला शिवीगाळ केली आहे त्यामुळे आरोपीस जामीन वर सोडावे अशी विनंती आरोपीच्या वकिलांनी केली होती, फिर्यादीचे वकील करण शिंदे यांनी माननीय न्यायालयास विनंती केली की हा खून जातीय द्वेष भावनेने केलेला ऑनर किलिंगचा प्रकार आहे हा निर्गुण खून आरोपीने खोट्या प्रतिष्ठेमुळे केलेला आहे मयत विकासचा खून हा दुर्मिळातील दुर्मिळ हत्या आहे त्याच्या शरीरावर तीस ते चाळीस जखमा असून सतत वीस तास मारहाण केल्यामुळे या हत्येस सर्वच आरोपी जबाबदार आहेत अशी मांडणी फिर्यादीची वकील ऑड.करण शिंदे यांनी माननीय न्यायालयासमोर प्रभावीपणे केली त्यामुळे अतिरिक्त सत्र न्यायालय बीड यांनी आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केलेला आहे.ऑड. करण शिंदे यांचे अभिनंदन ऑड.भीमराव चव्हाण,ऑड.हर्षल बहिर ऑड. अक्षय मुळे ऑड. अभिजीत कदम ऑड.सचिन केकान ऑड.अझहर शेख यांनी केले आहे.

# ढाबा मालकाच्या खून प्रकरणातील आणखी तीन आरोपींना अटक

## चार दिवसाची पोलीस कोठडी

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव-पाथरी रोडवर ढाबा मालक महादेव गायकवाड यांच्या खून - प्रकरणातील फरार असलेले तीन आरोपींना दि.२३ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता आनंदगाव शिवारातून अटक केली आहे. सदरची कारवाई माजलगाव ग्रामीण पोलिसांनी केली आहे. माजलगाव-पाथरी रोडवरील हॉटेल गावरान ढाबा मालक महादेव गायकवाड व आरोपीमध्ये बिल देण्या घेण्या वरुन वाद झाला यात महादेव गायकवाड याचे

डोक्यामध्ये लाकडी ढलपी व लाकडाने गांभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.तर मयताचा मुलगा आशुतोष गायकवाड हा सुद्धा गंभीर जखमी झाला होता. आशुतोष गायकवाड याच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये माजलगाव कारखान्याचे माजी संचालक शिवाजीराव थावरे यांचा मुलगा रोहित थावरे याच्यासह सहा जणांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.हे सर्व आरोपी फरार झाले होते.स्थानिक गुन्हे शाखेच्या बीड पोलिसांनी रोहित थावरे,ऋषिकेश थावरे, कृष्णा थावरे या तिघांना आळंदी येथून अटक केली होती तर याच गुन्ह्यातील तीन आरोपी फरार होते.त्याही आरोपींना ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी,एपीआय सोनवळे,पोलीस कॉन्स्टेबल राऊत,गोविंद बाबरे,अनिल असेवार व इतरांनी दि.२३ एप्रिल रोजी गुप्त माहितीदाराच्या बातमीवरून आनंदगाव शिवारातील शेतामध्ये झोपलेल्या आरोपी शुभम लहू वावळकर,अजय नामदेव सहजराव व अभिजीत दगडू घायाळ या तीन आरोपींना पोलिसांनी अटक करून माजलगाव न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना दि.२६ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे




बीड - बीड जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.

# बीड जिल्ह्यात पोलिसांची नाकाबंदी, ३०७ वाहनांवर कारवाई जवळपास १२ लाख रुपयांचा दंड वसूल !



बीड राजयोग प्रतिनिधी

बीड जिल्हाभरात सायंकाळी ४.३० ते ७.३० या दरम्यान मोटर वाहतूक कायद्यानुसार नाकाबंदी करण्यात आली. या कारवाईमध्ये जवळपास ३०७ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून १२ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. सदरील कारवाई बीड जिल्हा वाहतूक शाखेने पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार केली आहे.

सदरील कारवाया करण्याकरिता पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत सर यांच्या आदेशाने अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर व श्रीमती तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कवच नाकाबंदी करण्यात आली .सदर नाकाबंदी करिता सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी अंमलदार नेमण्यात आले होते.

सदर कारवाई दरम्यान १२०१ चलनचे ९ लाख ७३ हजार ५५० रुपये वसूल करण्यात आले असून तसेच ३०७ नव्याने केसेस करण्यात आलेले आहेत.त्याचा २ लाख २३ हजार ७५० दंड आकारण्यात आलेला आहे. सदर नाकाबंदी पाडळसिंगी टोल नाका, पांगर बावडी ब्रिज, केज टोल नाका, धारूर टोल नाका, अंबाजोगाई टोल नाका, चुंबळी फाटा, अंभोरा चेक पोस्ट, इतके कॉर्नर परळी ,परभणी टी पॉइंट माजलगाव, या ठिकाणी नेमण्यात आलेली होती.

# लयी भारी समोसा एकदा खाणार तर पुन्हा आवडीने घेणार !

## घरपोच समोसा विक्रितून फाटलेल्या संसाराला सांधण्याचा प्रयत्न !

आई आणि पत्निचे सहकार्य तरमुलाचाही सहभाग !

मानूर प्रतिनिधी ह्व

पारंपारिक व्यवसाय मोडकळीस आल्याने संसाराचा गाडा चालवण्यासाठी नव्या वाटा शोधून थेट ग्राहकांच्या घरपोच चटकदार खाऊ विक्रिचा फिरता व्यवसाय शोधून फाटलेल्या संसाराला सांधण्याचा प्रयत्न करतोय रायमोहाचा जालिंदर गंगाधर सुरवसे ,घरच्या घरी पत्नि आणि आई खमंग समोसा त्याचे सोबत चिंचवण घेऊन बाप आणि मुलगा शिरूरसह अन्य गावांत आणि ते देखिल संध्याकाळी गल्लोगल्ली फिरून समोसा विक्री करण्याची त्याची विक्रिकला देखील अफलातून म्हणावी लागेल .

शहरात गावांत गेला की त्याच्याच स्टाईल मधे आरोळी ठोकतो ती म्हणजे लयी भारी समोसा ,एकदा खाणार तर पुन्हा आवडीने घेणार ! लहाण मुल देखील म्हणतात बरं पप्पा पप्पा समोसा लयी भारी घ्या चार पांच घरी ! अशा ग्राहकाला आकर्षीत करणा-या आवाजातून तास दोन तासात समोसा विकून होतो मोकळा .

घरची पाटीभर गरीबी ,सुतार काम व्यवसाय वडीलोपार्जित आता पार मोडकळीला आला ,वडीलाचे कृपाछत्र हरवले आणि जबाबदारीचे ओझे कोवळ्या वयात वाहतांना नवा मार्ग शोधला कमी भांडवलात मात्र घरी दोन घास मिळतील यासाठी भांडवलाचा अभाव असला तरी पापड ,खारी विक्री सुरू करून रोज हजार पंधराशे रूपयाची पुंजी मिळू लागली ,स्वत: चे लग्न स्वत: च केले एव्हडेच नव्हे तर बहिणींचे लग्न करून त्यांचा संसार सुरू केला .या अभिनव विक्रीतून आता जालिंदरने घरीच खमंग समोसा बनवून त्याची विक्री करू लागला आणि नाव दिले रायमोहाचा समृध्दी समोसा .



शिरूर शहरासह घा.पारगांव ,खरवंडी ,खोकरमोह ,हिवरसिंगा ,राजूरी ,पाडळी ,तागडगांव, खालापुरी , नागरेवाडी अशा गावांत फिरत्या पध्दतीने समोसा विक्री करतांना वेळ निवडली संध्याकाळची ,याचे कारणही तसेच सांगतो संध्याकाळी सर्वजन रानातून घरी येत असतात अशा वेळी विक्रिसाठी फार सायास करावे लागत नसल्याचे सांगतो .बाप आणि मुलगा यांचे कष्ट आदर्शवत !

दिवसभर काम करून लोक आपल्या घरी विसावतात अशा वेळी बाप बेटा समोसा घेऊन रात्री नवू वाजेपर्यंत भटकंती करून समोसे विकून उशिरा रायमोहा येथे घरी पोहचतात .

भांडवलाचा अभाव मोठा व्यवसाय कसा करणार याची खंत व्यक्त करतांना थांबला तर तो संपला या न्यायाप्रमाणे अल्प भांडवलावर हा व्यवसाय सुरू केला असुन सहा माणसांची भुक भागवण्याचे काम करतो ,मालाबरोबर आपण विक्रीसाठी अगदी घरात आवाज जाईल याची काळजी घेत आवाजाची धार लावतो असे सांगुन आई पत्नी आणि मुलगा सर्वांचेच हात झटत असल्याने सुखाचा घास मिळत असल्याचे समाधान व्यक्त करतो .



## संपादकीय

# नाले व कचरा सफाई ; केवळ कागदावरच नसावी

पावसाळा आता जेमतेम सव्वा महिन्यावर आलेला आहे. पावसाळी हंगामास दरवर्षी कागदोपत्री १ जूनला सुरुवात होत असली तरी खऱ्या अर्थाने सहा-सात जूननंतरच पाऊस बरसण्यास सुरुवात होते. पावसाळा सुरू झाल्यावर पथदिवे बंद पडलेले, रस्त्यात खड्डे पडलेले, गटारे-नाले तुंबलेले, रस्ते जलमय झालेले असे चित्र कोठेही निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, नगर परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांना एप्रिल आणि मे या दोन महिन्यांतच पावसाळीपूर्व कामांना गती द्यावी लागते. पावसाळीपूर्व कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये विशेष निधीची तरतूद करण्यात येत असते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सभागृह अस्तित्वात असताना प्रशासन या कामांची यादी सादर करत असते व लोकप्रतिनिधी या कामांना मंजुरी देत असतात; परंतु कोरोना महामारीच्या साथीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्याच नसल्याने सर्वत्र प्रशासकीय राजवट असून प्रशासकाच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सध्या चालविला जात आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प देशातील काही छोट्या राज्याहून मोठा आहे.

केवळ अर्थसंकल्पच नाही, तर महापालिका कार्यक्षेत्रात येणारी लोकसंख्याही कोटींच्या घरात आहे; परंतु मुंबई महापालिकेचा भूभाग तुलनेने कमी असून त्या कमी भूभागातच ही लोकसंख्या सामावलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हार्बरमार्गे मानखुर्दपर्यंत, मध्य रेल्वेने मुलुंडपर्यंत, पश्चिम रेल्वेने चर्चगेट ते दहिसरपर्यंत तसेच कुलाबा याचा समावेश करून येणाऱ्या परिसरात मुंबई महापालिका सामावलेली आहे. मुंबई शहराची लोकसंख्या वाढत असताना व जलपुरवठा करणाऱ्या तलावांची संख्या तितकीच असताना व जलवहिन्या जुनाट असतानाही मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना कधीही करावा लागत नाही, याबाबत महापालिकेच्या कामगिरीला खरोखरीच 'सलाम'च करावा लागेल. मुंबईतील नाले व गटारे पावसाळ्याचा अपवाद वगळता कोठेही तुंबलेले पाहावयास मिळत नाही. पथदिवे बंद दिसत नाही. मुसळधार पाऊस झाल्यास अथवा सोसाट्याचा वारा सुटला, तर फांद्या पडण्याच्या अथवा वृक्ष पडण्याच्या घटना घडत असतात. अन्यथा फारशा दुर्घटना घडत नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमध्ये पावसाचे पाणी तुंबण्याचे अथवा परिसर जलमय होण्याचे प्रमाणही मंदावलेले आहे. प्रशासकीय राजवटीत मुंबई महापालिकेच्या कामाला काही प्रमाणात 'शिस्त' लागलेली आहे, असे म्हणणे देखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. जवळ आलेला पावसाळा पाहता पावसाळीपूर्व कामासाठी मुंबई महापालिका प्रशासन सतर्क झाले असून अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत. मुळातच नालेसफाई व गटाराची तळापासून स्वच्छता या दोन गोष्टी सांभाळल्यास मुंबईची तुंबई होण्याची पुनरावृत्ती होत नाही आणि अलीकडच्या काळात त्याचे प्रमाणही कमी झालेले आहे.

महापालिका आयुक्त भूषण गगरानी यांनी पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केल्याने अधिकारी व कर्मचारी त्या-त्या कामांना गती देऊ लागले आहेत. कंत्राटदारांचीही वेळेत कामे पूर्ण करून देण्यासाठी लगबग वाढली आहे. नाल्यातून काढलेला गाळ अनेकदा त्या ठिकाणी बरेच दिवस पडून असायचा, तो गाळ आणि कचरा वेळेत उचलला न गेल्यास कचरायुक्त गाळ रापण्यास सुरुवात होऊन त्या-त्या परिसरातील रहिवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असतो. हे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका आयुक्त गगरानी यांनी नालेसफाईतून काढलेला गाळ ४८ तासांमध्ये उचलण्याचे ठेकेदारांना निर्देश दिले आहे. हा कचरामिश्रीत गाळ वेळेवर उचलला गेल्यास मुंबईकरांची दुर्गंधीतून व बकालपणापासून मुक्तता होण्यास मदतच होणार आहे. मुंबईत गटारांची व नाल्यांची संख्या मोठी असल्याने गटारांची सफाई व नालेसफाई करण्याचे अग्निदिव्य महापालिका प्रशासनाला दरवर्षीच पार पाडावे लागत आहे. याशिवाय गटारे व नाले नागरी वस्तीतून, चाळींमधून वाहत असल्याने त्या ठिकाणी नालेसफाई करताना करावी लागणारे कामे हा एकप्रकारे 'द्राविडी प्राणायम' असतो, ही अतिशयोक्ती नसून वास्तविकता आहे.

# पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने

लिंबागणेश ।प्रतिनिधी

जम्मू -काश्मिरच्या पहलगाम मधील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणारे बैसरण खोरे येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.

यावेळी हिंदू -मुस्लिम भाई भाई म्हणत पाकिस्तान मुर्दाबाद हल्लेखोरांना फाशी द्या पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द,अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अॅड . गणेश वाणी,अशोकराजे वाणी ,महादेव कुदळे,शेख शफीभाऊ, समीर शेख,कैलास काटे, बालाजी निर्मळ,शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर,



सुरेश निर्मळ,कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे,आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.

# देगलूर तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

देगलूर । प्रतिनिधी

ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण सोडतीतून गाव,वाड्या व तांड्यांतील मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडती शुक्रवारी (२५ एप्रिल) पंचायत समितीच्या सभागृहात पार पडल्या. या सोडतीतून कहीं खुशी, कहीं गम असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले.२०२५-३० कालावधीसाठी आरक्षण निश्चितया सोडतीतून देगलूर तालुक्यातील एकूण ९० ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले.प्रत्येक गावातील तहसीलदारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोडतीदरम्यान अनेक इच्छुक उमेदवार उपस्थित होते. काहींना आरक्षणामुळे अपेक्षेप्रमाणे संधी मिळाली, तर काहींच्या आशांवर विरजण पडले.



राजकीय दृष्टिकोनातून संवेदनशील गावांमध्ये विशेष लक्ष तालुक्यातील काही राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या गावांमध्ये आरक्षण कोणाला लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला, तर काहींच्या चेहऱ्यावर निराशा झळकली.

आरक्षण सोडती शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते पारपडली ही सोडत साई गणेश पोकलवार आणि सजफा वाजीद पठाण (तिसरी वर्ग) या विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली. तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी आरक्षण जाहीर केले.यावेळी उपजिल्हाधिकारी व संनियंत्रण अधिकारी अनुप पाटील, नायब तहसीलदार गिरीष सरकुलवार, महसूल अधिकारी व इतर विविध विभागांचे अधिकारी तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिलांना ४७ ग्रामपंचायतींमध्ये संधी

या आरक्षण प्रक्रियेमुळे एकूण ४७ ग्रामपंचायतींमध्ये महिलांना सरपंचपदाची संधी मिळणार असून महिला नेतृत्वाला मोठे प्रोत्साहन मिळाले आहे.आरक्षण प्रक्रियेने ग्रामीण भागातील नेतृत्व बदलाची दिशा निश्चित केली आहे. काहींसाठी ही प्रक्रिया संधीची दारे उघडणारी ठरली, तर काहींसाठी पुढील वेळेची वाट पाहण्याची गरज आहे. ग्रामपंचायतीतील आरक्षण हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा टप्पा असून याचा सामाजिक समावेशाच्या दिशेने मोठा वाटा आहे.




# राष्ट्रवादी शरद पवार साहेब पक्षाचे वतीने पहलगाम हल्ल्याचा निषेध

बीड ।प्रतिनिधी

काश्मीर येथे पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार साहेब) महिला पदाधिकाऱ्यांनी तीव्र निषेध केला. या हल्ल्यात मृत्यु झालेल्या बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ महिलांनी मेणबत्त्या पेटवत श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी पक्षाच्या नेत्या ड. हेमा पिंपळे तसेच अनिताताई वाघमारे, राणीताई शेख,सुवर्णाताई चव्हाण, हिनाताई शेख, गणेश खोपे सर,भाऊसाहेब नांदे सर,स्नेहाताई खंडागळे,अशोक मसलेकर सर, यासह अनेक महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि नागरिकांची उपस्थिती होती.

# दु:खाची निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती हे जिवाचे कर्तव्य आहे - सिद्धेश्वर महाराज बागलाने

बीड ।प्रतिनिधी

मृत्युलोकी प्रत्येक जीवास सुखाची अपेक्षा आहे .दुःख कोणास आवडत नाही .सुखासाठी प्रयत्न करतात पण दुःखच जास्त मिळतात. संत मात्र प्रत्येक जीवाचे दुःख उच्चाटन करून परमानंद प्राप्त करून देतात. म्हणजेच अत्यंतिक दुःखाची निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती करणे हे जिवाचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन हरिभक्ती परायण सिद्धेश्वर महाराज बागलाने यांनी विठ्ठल मंदिर, अंबिका नगर, पांगरी रोड बीड येथे तिसरे कीर्तन पुष्पगुंफतांना केले.

बीड येथील विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त व वै.उत्तमराव सारंगकर यांच्या ८ व्या पुण्यस्मरणानिमित्त विसाव्या शतकातील महान संत हरिभक्त परायण सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी हभप नारायण महाराज श्री संत माऊली महाराज संस्थान उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात तिसरे कीर्तन पुष्पगुंफतांना देव घ्या कोणी देव घ्या कोणी/ आयता आला घर पुसोनि//१//या संत तुकाराम महाराज यांच्या सहा चरणी अभंगातून हरिभक्त



परायण सिद्धेश्वर महाराज बागलाने यांनी तुकाराम महाराज यांना आलेला स्वानुभव सांगितलेला आहे.

यावेळी हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी (भागवताचार्य ) रामहरी रसाळ गुरुजी, विभागीय प्रवक्ता अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्री अनंत घीगे साहेब जिल्हा प्रसिद्धी प्रमुख वारकरी मंडळ व पत्रकार दैनिक रिपोर्टर, सुनील लांडगे, दिलीप वखरे, विठ्ठल कथले,अजय सारंगकर गुरुजी ,रामचंद्र कागदे गुरुजी,

गायक म्हणून ह भ प चिंतामण महाराज मोरे ,नवनाथ महाराज नाईकवाडे ,अंगद महाराज सातपुते , उत्तरेश्वर महाराज पूर्वे मारुती महाराज कथले ,महारुद्र महाराज,उमाशंकर महाराज शिंदे, रामकृष्ण खटाणे महाराज मृदंग वादक म्हणून: यश महाराज तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

# तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे मानेच्या मणक्याची गुंतागुंतीची यशस्वी शस्त्रक्रिया

## मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले ठरत आहेत रुग्णांसाठी वरदान



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरात नगर नाका येथे नव्याने सुरू झालेले सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांचे तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर येथे गेल्या दीड महिन्यात अनेक यशस्वी गुंतागुंतीच्या मान, मनका, कंबर दुखी, पाठ दुखी व इतर अस्थिरोगाच्या गुंतागुंतीच्या असणाऱ्या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या आहेत त्याचप्रमाणे हाता पायाला मुंग्या येणे, हात न उचलणे अशा त्रासाने त्रस्त असणाऱ्या तसेच अनेक चांगल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेऊनही मानेच्या मणक्याची नस दबल्या कारणाने त्रस्त असणाऱ्या ५० वर्षीय रुग्ण तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि मनका विकार विभाग बीड येथे दाखल झाल्यानंतर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी रुग्णाची तपासणी व अस्तवाईक पणे उपचार व मार्गदर्शन करून रुग्णाला शस्त्रक्रियाची गरज असल्याचे सांगितले. रुग्ण शस्त्रक्रियेसाठी तयार झाल्यानंतर गेल्या अनेक वर्षांपासून मानेच्या मणक्याची नस दबल्या कारणाने गुंतागुंतीची असणारी शस्त्रक्रिया अगदी माफक दरात मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी दोन तास परिश्रम घेऊन मानेच्या मणक्याची यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडली...

शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णाला योग्य ते उपचार योग्य ते मार्गदर्शन मेडिसिन याने पहिल्यांदा पेक्षा रुग्ण ठणठणीत बरा झाला रुग्णाने व रुग्णाच्या नातेवाईकांनी मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले, भुलतज्ञ डॉ वाघमारे तसेच तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल बीड यांचे आभार मानले..! मान,मनका,कंबर दुखी,पाठ दुखी गुडघेदुखी, अंग दुखी, तसेच हाडाच्या इतर रोगासंबंधी भेटण्यासाठी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे ७७७०००३२२९,८६६८२१२३३१ या नंबर वरती संपर्क साधण्याचे आवाहन सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी केले आहे.

# नगर परिषदेने उन्हाळ्यात पाणी लवकर सोडावे

**बीड (प्रतिनिधी) सध्या कडाक्याचे ऊन आहे. त्यामुळे पाणी भरपूर लागते. अशा परिस्थितीत बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीपासून बीड शहरात पाणी नाही. त्यामुळे नगर परिषदेने पाण्याचे योग्य नियोजन लावून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी. सुविधा पुरवणे, हे नगर परिषदेचे काम आहे. त्यात कोणताही उपकार नाही. त्यामुळे पाणी वेळेवर सोडावे. मतदारांनी अशा बाबी लक्षात ठेवाव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.**

माजलगाव आणि पाली येथून बीडला पाणी येते. माजलगाव कडून येणाऱ्या पाईप लाईनच्या दुरुस्तीमुळे अनेक दिवस पाणी नव्हते. दुरुस्तीचे नियोजन हे अगोदरच करणे आवश्यक होते. मात्र ऐन कडक उन्हाळ्यात पाईप लाईन दुरुस्तीचे काम काढणे चुकीचे आहे.

देखरेख करणे हे सातत्यपूर्ण काम आहे. त्यामुळे कुठला पाईप खराब होत आहे, हे नगर पालिकेला अगोदरच माहीत असणे आवश्यक असते. मात्र नियोजनाचा अभाव असलेल्या बीड नगर परिषदेने जनतेची कुचंबना चालवली आहे. कडक उन्हाळ्यात बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीनंतर पाणी मिळत असेल, तर नागरिकांनी पाण्यासाठी कोणते नियोजन करावे, याचे उत्तर देखील नगर पालिकेने दिले पाहिजे.

नगर परिषद हद्दीतील जनता नगर पालिकेला सातत्याने टॅक्स देत असते. जर जनता टॅक्स देत नसेल तर तो वसूल करण्याची जबाबदारी देखील पालिकेची आहे. मात्र या सर्वांकडे कानाडोळा करून नगर पालिका चुकीच्या पद्धतीने चालत असेल, तर दोषींवर कारवाई व्हायला हवी. त्यामुळे नगर पालिकेने नागरिकांना आवश्यक तेवढे पाणी पुरवावे. आठ दिवसाला पाणी सोडावे, असे आवाहन



देखील देशमुख यांनी केले आहे.

सध्या कडाक्याचे ऊन आहे. त्यामुळे पाणी भरपूर लागते. अशा परिस्थितीत बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीपासून बीड शहरात पाणी नाही. त्यामुळे नगर परिषदेने पाण्याचे योग्य नियोजन लावून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी.




बीड - जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी पदभार स्वीकारल्या नंतर त्यांचा सत्कार करताना शिवसंग्रामचे बीड शहराध्यक्ष सुहास पाटील, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष हरिदास घोगरे, जिल्हाध्यक्ष सुनील कुर्लेकर, जिल्हा सरचिटणीस कैलास सपकाळ, बीड तालुका अध्यक्ष शरद पवळ व इतर.

# राजेंद्र पवार महावितरणच्या संचालक (मानव संसाधन) पदी रुजू

मुंबई ।प्रतिनिधी

दि. २५ एप्रिल २०२५: महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून श्री. राजेंद्र पवार यांनी शुक्रवारी (दि. २५) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. तर गेल्या सव्वादोन वर्षांपासून श्री. पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.



संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी श्री. पवार यांनी स्वतः 'ऑन फिल्ड' राहून मुंबईचा महापूर, 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळे, 'कोरोना' आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.'महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधनाचे एक आश्वासक व्यवस्थापन सदैव उपलब्ध राहील. कंपनी व कर्मचारी हिताला प्राधान्य देत अंतर्गत प्रशासकीय कामकाज आणखी गतिमान करण्यासह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षणातून कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यावर भर राहणार आहे.- राजेंद्र पवार, संचालक (मानव संसाधन)

# जालींदर धनवडे यांना जिल्हा परिषदेचा आदर्श ग्रामपंचायत आधिकारी पुरस्कार प्रदान



मानूर ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील नांदेवाली ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी जालिंदर मारुती धनवडे यांना उत्कृष्ट कार्याबद्दल आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार देऊन सपत्नीक गौरवण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

जालिंदर धनवडे हे गेली १२ वर्षे ग्रामपंचायतीच्या सेवेत कार्यरत असून त्यांनी नाळवंडी, कार्यगाव, पांढरवाडी, गंधनवाडी आणि सध्या नांदेवाली येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम पाहात आहेत. त्यांच्या कार्यकाळात स्वच्छ भारत अभियान, वृक्षारोपण, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, घरकुल योजना, पाणीपुरवठा योजना यांसारख्या शासकीय योजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या. गावातील कर वसुलीतही त्यांनी १०० टक्के उद्दिष्ट साध्य केल्याने त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरले.पुरस्कार बदल गावचे सरपंच अंकुश शेळके, उपसरपंच बबनराव थिटे, माजी सरपंच जालिंदर थिटे, राजेंद्र भोसले, संतोष लोणके, शंकर शेळके, लक्ष्मण वखरे, शरद लोणके, गंगा लोणके, भारत थिटे, भगवान शेळके,पत्रकार चंद्रकांत राजहंस,कातखडे, खताळ आदी ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सातेफळ येथील रेणुका देवी यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील सातेफळ येथील रेणुका देवी यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.रेणुका देवी हे भारतातील प्रमुख ५१ शक्तिपीठांपैकी एक पीठ आहे.या देवीला एकवीरा,यमाई,येल्लु आई तसेच येल्लम्मा अशा विविध नावाने विविध प्रांतात संबोधले जाते.ही देवीआदिशक्ती चे प्रकट रूप महाकाली म्हणून पूजली जाते. महाराष्ट्र,कर्नाटक, तेलंगणा,आंध्र प्रदेश, छत्तीसगढ,मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड,जम्मू व काश्मीर ह्या राज्यात रेणुका देवीचे उपासक प्रामुख्याने आढळतात. महाराष्ट्रात माहूरगड व्यतिरिक्त दैत्यसंहारा साठी व भक्त कल्याणा साठी रेणुकामातायमाई, एकविरा,मोहटादेवी, पद्माक्षी,रेणुका अशा नानाविध अवतारांत प्रकट झाली.रेणुका देवीला साऱ्या जगाची आई अर्थात जगदंबा मानतात.रेणुका माता ही क्षत्रिय,ब्राह्मण, आदिवासी व पतीतांची माता व रक्षक म्हणून सर्वांकडून पूजली जाते. त्याचबरोबर कोळी, आगरी लोकांची आई म्हणून तिचे एकवीरा हे रूप प्रसिद्धआहे.रेणुका ही इक्ष्वाकु वंशातीलरेणु नावाच्या महाराजाची कन्या,आणि जमदग्नी ऋषीची पत्नी होती.या जोडप्याला पाच मुलगे होते,त्यातील एक हे भगवान परशुराम आहेत.सप्त चिरंजीवां पैकी असलेले भगवान परशुराम हे अजूनही महेंद्र पर्वतावर गुप्त स्वरूपात तप करत आहेत अशी मान्यता आहे.सातेफळ येथे दर वर्षीप्रमाणे श्री रेणुका देवी यात्रा महोत्सवाचे दि.२१ एप्रिल २०२५ ते २३ एप्रिल २०२५ रोजी आयोजन करण्यात आले.देवीच्या गाड्या ओढणे,देवीचा छबिना, शोभेची दारू,आराधी मंडळाची गाणी तसेच कुस्त्या असे कार्यक्रम संपन्न झाले.शेवटची कुस्ती ४१०० रूपयांची झाली,बैलगाडा शर्यत हे कार्यक्रम कमिटी व सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याने,तसेच गावातील सर्व तरुण मंडळाने अतिशय मेहनत व योग्य नियोजन करून सर्व कार्यक्रम पार पाडले. गावकऱ्यामुळे व सर्व ग्रामपंचायत सदस्य, आजी,माजी पदाधिकारी,सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या सहकार्या मुळे व प्रशासनाच्या सहकार्यामुळे सर्व काही व्यवस्थित झाले.तसेच मांगवडगाव,हादगाव, डोका,साळेगाव,कळंब, माळेगाव येथील लोक यात्रेला येतात.व कार्यक्रमाची शोभा वाढवतात.त्यामुळे सर्वांचे खूप खूप आभार ग्रामस्थ व सरपंच कृष्णा सोपान थोरात यांच्याकडून मानण्यात आलेले आहेत.




# पस्तिसाव्या अंखड हरिनाम सप्ताहाचा समारोप !

## श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन!



स्वागत दिंडीने गोकुळ अवतरले !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील कोळवाडी येथे वै भागवय महाराज यांनी प्रारंभ केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप शुक्रवारी श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला ,शिवाजी महाराज यांच्या स्वागत दिंडीने कोळवाडीत गोकुळ अवतरले याची अनुभूती आली .महंत भानुदास शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या सप्ताहात गेली सात दिवसापुनन कीर्तन प्रवचन ,हरिपाठ , काकडा व ज्ञानेश्वरी पारायण असे कार्यक्रम संपन्न झाले . पाहता गोवळी खाय त्यांची ऊष्टावळी या गौळणपर अभंगावर त्यांनी विवेचन करतांना गोकुळातील कृष्णलिला सांगतांना भक्तिप्रेमाची महती सांगितली .गायकीला मृदंग वादक गोरख कोकाटे यांनी साथ केली .आरती झाल्यानंतर उपस्थित भाविकांना आयोजकाकडून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .

नारळी सप्ताहाची मागणी !

राक्षसभुवनला नुकताच भव्य नारळी सप्ताह संपन्न झाला त्याचप्रमाणे आम्हा कोळवाडीकरांना नारळी सप्ताहाची संधी देण्यात यावी त्यासाठी नारळ द्यावा असी मागणी ग्रामस्थाकडून करण्यात आली . या मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल असा शब्द देण्यात आला .



# ज्ञानराधा मल्टीस्टेटचे केज येथील ठेवीदार लवकरच तहसीलदार यांच्याकडे निवेदन देणार - किरण आस्वले

केज/प्रतिनिधी

दि.२५ एप्रिल २०२५ रोजी केज येथील श्री. किरण अस्वले सर यांनी बँकेच्या दारात एक बैठक घेतली.यामध्ये मोठया प्रमाणात ज्ञानराधा मल्टीस्टेटचे ठेवीदार उपस्थित होते. श्री. किरण आस्वले सर यांनी सांगितले की,केवळ केज शाखेमध्ये ३५० ठेवीदार यांची संख्या असून त्यांचे २०० कोऊ रुपये ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये अडकलेले आहेत. या शिवाय बाकीचे खातेदार हे वेगळे असुन या सर्वांचे पैसे अडकून पडलेले आहेत.यासाठी ठेवीदारांनी एकत्र येण्याची गरज असून सहकार्य करणेही गरजेचे आहे.याच संदर्भात ही बैठक बोलावण्यात आली होती या बैठकीला ठेवीदारांनी चांगला प्रतिसाद दिला असून बऱ्याच ठेवीदारांनी त्यांचे मत व्यक्त केले आहे.येत्या ६ मे २०२५ रोजी सर्वच ठेवीदार बँकेच्या दारात एकत्र येणार असून नंतर ते केज तहसीलदार यांच्या कडे निवेदन देणार आहेत.यासाठी सर्वच ठेवीदारांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.या नंतर ही कार्यवाही झालीच नाही तर मात्र आमरण उपोषण करण्याचे ठरवले आहे.असे प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सांगितले आहे.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचे बक्षीस वितरण संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन अंतर्गत शुक्रवारी (दि. २५) पंचायत समितीच्या सभागृहात बक्षीस वितरण पार पडले. यावेळी जिल्हा परिषद गट व संस्था गटातील सहा शाळांना बक्षिसाच्या रक्कमेचा चेक वितरित करण्यात आला.राज्यातील सर्वच शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा हे अभियान शासनाने सुरू केले आहे. या अभियानांत शाळांना लाखो रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलेले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व जिल्हा परीषदेच्या व खाजगी शाळे मध्ये हे अभियान राबवीण्यात आले. शासनाने ठरवून दिलेले निकष पुर्ण करण्याऱ्या शाळांची तपासणी होऊन त्यांना प्रथम, व्दितीय व तृत्तीय बक्षीस जाहीर करण्यात आले. याचे बक्षीस वितरण शुक्रवारी पंचायत समितीच्या सभागृहात पार पडले. गटविकास अधीकार समृध्दी दिवाणे, गटशिणाधिकारी चाँद शेख, विस्तार अधीकार बी. के. नांदुकर, मधुकर सुर्वणकार, मुमताज पठाण यांच्या हस्ते बक्षीसाच्या रक्कमेचा चेक वितरीत करण्यात आला. तालुक्यातील



आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास संस्था गटाअंतर्गत दुसरे बक्षीस मिळाले. शाळेचे मुख्याध्यापक प्रा. एन. के. हजारे, प्रा. पी. एस. तरकसे, केंद्रप्रमुख आर. जी. पवार यांनी बक्षीसाच्या रक्कमेचा दोन लाख रुपयांचा चेक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्विकारला. या कार्यक्रमास तालुक्यातील मुख्याध्यापक विस्तारधीकारी, केंद्रप्रमुख उपस्थित होते.

सहा शाळांना बक्षीस जिल्हा परिषद गट व संस्था गटातील शाळा अश्या दोन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. जिल्हा परीषद गटात प्रथम जि. प. मा. शा. राडी, व्दितीय जि. प. प्रा. शा. नांदगाव, तृत्तीय जि. प. के. प्रा. शा. भावठाणा. संस्था गटात प्रथम योगेश्वरी नुतन मुलांचे विद्यालय अंबाजोगाई, व्दितीय जयकिसान मा. व उच्च मा. विद्यालया आपेगाव, तृतीय श्रीरात माध्यमिक विद्यालय भारज. या सहा शाळांना बक्षीसाची रक्कम वितरीत करण्यात आली. प्रथम बक्षीस तीन लाख, व्दितीय दोन लाख तर तृत्तीय एक लाख रुपयांचे होत.

# कोडींग कोर्स गुणवत्ताधारक डॉ. विठ्ठल जाधव सन्मानित

शिरूर कासार (प्रतिनिधी)

साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांना अमेझॉन फ्यूचर इंजिनिअर या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित कोडींग कोर्समध्ये गुणवत्ता धारण केल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते दि.२४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे लॅपटॉप भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, श्रीकिसन देशमुख, प्राचार्य विक्रम सारूक यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षण व्यवस्थेत नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढायला हवा असे आदित्य जीवने बक्षीस वितरण प्रसंगी बोलताना म्हणाले. डॉ. विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएच.डी पदवी प्राप्त असून त्यांच्या 'पांढरा कावळा' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन



बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. यासह मानवता व्हाऊचर लेखसंग्रह, एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य हा संशोधनपर समीक्षा ग्रंथ अशी दहा पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकुमार साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नियतकालिके, आकाशवाणीवर साहित्य लेखनास स्थान मिळाले आहे. मसापच्या प्रतिष्ठान नियतकालिक संपादक मंडळात ते कार्यरत आहेत.

या यशाबद्दल शिरूर तालुक्यातील शिक्षकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. दरम्यान तालुक्यातील प्रदीप दुधाळ यांना लॅपटॉप आणि गणेश शिंदे, किशोर सुपेकर, रामदास पाखरे, श्रीमंत तळेकर, अशोक सप्रे, स्वाती राऊत, संगीता वारे, संध्या कुलकर्णी या शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यशस्वीतांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, जमीर शेख यांनी स्वागत केले आहे.

# १५० वर्षांची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वराचा पालखी सोहळा सायंकाळी, उद्या महाआरती

परळी (प्रतिनिधी)

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे १५२ वर्षांची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्यानिमित्त शुक्रवारी (ता.२५) सायंकाळी १२ वाजता सुरुवात होणार असून शनिवारी (ता.२६) दुपारी १ वाजता महाआरतीने संपन्न होणार आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्या निमित्त शुक्रवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिव कथेचा प्रारंभ झाला. या हरिनाम सप्ताहात किर्तन, भजन, काकडा,गाथा भजन आदि संपन्न झाले. शुक्रवारी सकाळी अंकिता माने यांच्या शिवकथेचा समारोप झाला, दुपारी वासू देवानंद महाराज टाकळीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली तर मुख्य पालखी सोहळा शुक्रवारी रात्री १२ वाजता श्री.पापदंडेश्वर मंदिरातून निघणार असून रात्री पालखी मार्गावर भारुडे, शनिवारी सकाळी गवळणी, सोंगे व दुपारी महाआरती नंतर महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या पालखी सोहळ्यास व अखंड हरिनाम सप्ताहास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.



# पस्तिसाव्या अंखड हरिनाम सप्ताहाचा समारोप !

## श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन!

स्वागत दिंडीने गोकुळ अवतरले !

शिरूर कासार (प्रतिनिधी)

तालुक्यातील कोळवाडी येथे वै भागवय महाराज यांनी प्रारंभ केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप शुक्रवारी श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला ,शिवाजी महाराज यांच्या स्वागत दिंडीने कोळवाडीत गोकुळ अवतरले याची अनुभूती आली .

महंत भानुदास शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या सप्ताहात गेली सात दिवसापुनन कीर्तन प्रवचन ,हरिपाठ , काकडा व ज्ञानेश्वरी पारायण असे कार्यक्रम संपन्न झाले . पाहता गोवळी खाय त्यांची ऊष्टावळी या गौळणपर अभंगावर त्यांनी विवेचन करतांना गोकुळातील कृष्णलिला



सांगतांना भक्तिप्रेमाची महती सांगितली .गायकीला मृदंग वादक गोरख कोकाटे यांनी साथ केली .आरती झाल्यानंतर उपस्थित भाविकांना आयोजकाकडून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .

नारळी सप्ताहाची मागणी !

राक्षसभुवनला नुकताच भव्य नारळी सप्ताह संपन्न झाला त्याचप्रमाणे आम्हा कोळवाडीकरांना नारळी सप्ताहाची संधी देण्यात यावी त्यासाठी नारळ द्यावा असी मागणी ग्रामस्थाकडून करण्यात आली . या मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल असा शब्द देण्यात आला .

# युपीएससीत यश मिळविलेल्या अक्षयचा भगवानबाबा विद्यालय पांगरी कँप येथे सत्कार

परळी (प्रतिनिधी)

पांगरी कँप येथील श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी अक्षय मुंडे याने यूपीएससीची परीक्षेत ६९९ रँक घेत मिळवले यश मिळविल्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष फुलचंदराव कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला.

अक्षय च्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची.त्यात वडिलांचे छत्र बालपणीच हरवलेले अशा प्रतिकुल परिस्थितीत परळी तालुक्यातील पांगरी चा अक्षय संभाजी मुंडे हा गावातील संत भगवानबाबा विद्यालयातून दहावी उत्तीर्ण झाला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने बीडीएस ही वैद्यकीय शाखेची पदवी घेतली.आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी सुरू केली.

पुणे येथून दोन वर्षांपूर्वी तो नवी दिल्ली येथे गेला व स्पर्धा परीक्षांसाठी त्या ठिकाणी योग्य असे मार्गदर्शन मिळवत त्याने प्रचंड



मेहनत सुरू ठेवली. यूपीएससीच्या परीक्षेत त्याने ६९९ वी रँक मिळवत विजयाची माळ खेचून आणली. त्याच्या ह्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोपनर,शिक्षक रंगनाथ घुले,सुर्यकांत होळंबे,संदीपान कांदे,विष्णु मुंडे, गोविंद कराड,सुरेश मुंडे, बालासाहेब जोगदंड,नाथराव केंद्रे,संभाजी केंद्रे,भाऊसाहेब मुंडे,सचिन पवार,सिध्दार्थ बनसोडे,रघुनाथ चप्पे,धनराज चाटे,धम्मपाल रोडे,रुक्मिण शेप,बापु मुंडे,सचिन बारगजे आदी उपस्थित होते.



केज/प्रतिनिधी

कानडी माळी येथे श्री संत गोसावी बाबा महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त जंगी कुस्त्यांचाकार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.श्री गोसावी बाबा महाराज कानडी माळी गावचे ग्रामदैवत असून सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह दरवर्षी प्रमाणे आयोजित केला होता. सप्ताहात शेवटच्या दिवशी काल्याचे किर्तन ह.भ.प.प्रल्हाद महाराज गिरी वाहेगाव आमला यांचे गोड असे किर्तन संपन्न झाले व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.त्या नंतर जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात शेवटीची कुस्ती कानडी गावचे पैलवान विश्वास राऊत व बार्शी चे पैलवान विलास घुगे यांच्यात झाली यात कानडीमाळी गावचे पैलवान विश्वास राऊत विजयी झाले.विश्वास राउत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# फेलोशिप पासून २०२२ चे सारथी संशोधक विद्यार्थी एक वर्षांपासून वंचित

## श्रीकांत श्रीमंत सरवदे,सारथी संशोधक विद्यार्थी

केज/प्रतिनिधी

विद्यार्थी उच्च शिक्षणा च्या वाटेवर असलेल्या बहुजन समाजातील मराठा,कुणबी प्रवर्गा तील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप साठी संघर्ष करावा लागत आहे हे दुर्दैवी आहे. एकीकडे समाजातील सर्व घटकांमधील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेता यावे आणि संशोधनाला चालना मिळावी,यासाठी सरकारने सारथी योजना सुरू केली. मात्र,या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने याचा मूळ उद्देशच बाजूला पडला आहे.



उच्च शिक्षणाच्या वाटे वर असलेल्या बहुजन समाजातील मराठा, कुणबी प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप साठी संघर्ष करावा लागत आहे हे दुर्दैवी आहे. शिक्षण ही समाजासाठी गुंतवणूक असते पण सरकारसाठी ती खर्च वाटत असून हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. अधिकारी म्हणतआहेत निधी नाही,अर्थमंत्र्यांना विद्यार्थ्यांचे ऐकून घ्यायला वेळ नाही, व्यवस्थेला भान नाही आणि घेतलेल्या निर्णयांची अंमल बजावणी नाही.शिक्षण आणि सामाजिक न्याय विभाग कोणत्या धोरणा नुसार चालतेय,हेच कळेनासे झाले आहे. सरकार संशोधनाला गती देत आहे की शिक्षणाचा आणि संशोधनाचा गळा घोटत आहे यात स्पष्टता नाही.

शासनाने उडचछठक्र - २०२२ च्या संशोधक विद्यार्थ्यांची एक वर्षा पासून रखडलेली फेलोशिप,क्ठ-, उेपींशसशपलू आणि नोकरी न करण्याची घातलेली अट यामुळे संशोधन कसे करायचे? हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर असून संशोधना ला लागणारी पुस्तके, साहित्य,बाहेरगावी राहण्याचा,प्रवासाचा खर्च विद्यार्थ्यांना स्वत: च्या खिशातून करावा लागत आहेत.त्यामुळे विद्यार्थी दुहेरी संकटात सापडले असून त्यांची अर्थिक अडचण आणि त्यातून आलेले नैराश्य याला सर्वोतोपरी सरकार जबाबदार आहे असे प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सांगितले आहे.

# पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजाच्या वतीने तीव्र निषेध

## मानवतेला काळीमा फासणारी घटना - अड.जब्बार पठाण



पाटोदा (प्रतिनिधी)

काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा पाटोदा मुस्लिम समाजाच्या वतीने जुम्मा नमाज नंतर सामुदायिक तीव्र निषेध व्यक्त करण्यात आले यावेळी मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे असे मनोगत अड.जब्बर पठाण यांनी व्यक्त केले आहे.. हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने केली आहे.काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन भारत सरकारने यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना मुस्लिम समाजाच्या वतीने वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ अल्लाह देवो असेही यावेळी दुवा मागण्यात आली.

# मोदी ज्वेलर्सच्या नथ महोत्सवाने अक्षय्य तृतीया होणार आणखीन रंगतदार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अक्षय्य तृतीया हा स्त्रियांसाठी सोने खरेदीसाठी अतिशय महत्त्वाचा सण आहे. यानिमित्ताने अंबाजोगाई शहरात मोदी ज्वेलर्सच्या अक्षय्य तृतीया निमित्त खास महिलांसाठी अतिशय पारंपरिक अशा नथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मोदी ज्वेलर्सचे संचालक भूषण मोदी यांनी दिली आहे. अक्षय्य तृतीयेला खरेदी केलेले सोने हे कायम टिकते अशी आपली तथाभारतीय महिलांची धारणा आहे. स्त्रियांसाठी दागिने हा अगदी जिव्हाळ्याचा विषय तर आहेच त्याचबरोबर त्याचे गुंतवणूक मूल्यही खूप मोठे असल्याचे मानले जाते.म्हणूनच इतर सर्व प्रकारच्या दागिन्यांसमवेत मोदी ज्वेलर्सने खास नथ महोत्सव जाहीर केला आहे.

नथ म्हणजे प्रत्येक स्त्रीसाठी अभिमानाचा आणि मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. अंबाजोगाईमध्ये प्रथमच होणाऱ्या या महोत्सवात नथीचे विविध प्रकार जसे मराठा नथ, पिकॉक नथ , कारवारी नथ , स्टोन नथ , जिजाऊ नथ , बानू नथ, म्हाळसा नथ, कास्टिंग नथ, पेशवाई नथ, जोधा अकबर नथ, डायमंड नथ अशा विविध व्हरायटीज पहायला मिळणार आहेत. पारदर्शी व्यवहार तसेच अगदी आपल्या बजेटमध्ये बसणाऱ्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची लेटेस्ट व्हरायटीज आणि आपुलकीची सेवा यामुळे मोदी ज्वेलर्सला ग्राहकांची पसंती मिळते आहे.यंदाही अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सोने खरेदीसाठी पेढीला आणि नथ महोत्सवाला ग्राहकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन मोदी ज्वेलर्स च्या वतीने करण्यात आले आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयात निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमांतर्गत चावडी वाचनाचा दुसरा टप्पा संपन्न

केज/प्रतिनिधी

साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत चावडी वाचन व गणन कार्यक्रम सन २०२४- २५ या वर्षातील दुसरा टप्पा दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी घेण्यात आला.चावडी वाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष श्री.राजेश कापसे सर उपस्थित होते.तर या कार्यक्रमाचे प्रमुख पक्षअतिथी म्हणून शाळेच्या मु.अ.प्रा.डॉ. कविता गित्ते मॅडम व वअधीक्षक श्री.चाटे बी. पी.हे उपस्थित होते. चावडी वाचनाच्या प्रास्ताविकामध्ये डॉ. श्रीमती गित्ते मॅडम यांनी पालकांचा आणि समाजाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत किती महत्त्वाचा वाटा आहे. तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांचा त्या त्या वर्गामध्ये भाषा, गणित यांचा पाया पक्का झाला तरच इतर विषयाचे ज्ञान घेणे व व्यक्त होणे विद्यार्थ्यांना कठीण जात नाही आणि म्हणून त्या त्या वर्गाचा पाया त्याच वर्गात पूर्ण होणे ही विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक पालक यांची ही जबाबदारी आहे.जर पाया पक्का असेल तर इमारत पक्की उभी राहते म्हणूनविद्यार्थ्यांचा बेस पक्का असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी शाळेने विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करून त्या त्या स्तरानुसार शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्यापन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये झालेली प्रगती पालकांसमोर चावडी वाचनाच्या माध्यमातून दाखवण्यात आली.याचाच पहिला टप्पा दि.५एप्रिल २०२५ रोजी घेण्यात आला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचेसूत्रसंचालन श्री.गुजर एल.जी सर यांनी केले तर सह शिक्षिका श्रीमती शेख मॅडम यांनी वर्ग पहिली ते वर्ग पाचवी च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व गुणवत्ता पालकांना दाखवली. विद्यार्थ्यांची मराठी, गणित व इंग्रजी या विषयातील प्रगतीपाहून माता पालक व पुरुष पालकांनी शाळेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले आणि आमच्या मुलांना या शाळेत आम्ही बारावी पर्यंत शिकवू आम्ही कुठेही घेऊन जाणार नाहीत असे आश्वासन यावेळी पालकांनी दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती दाजी मॅडम

# जलसाक्षरता ही काळाची गरज,पाण्याचे संकलन,व्यवस्थापन व गुणवत्ता ही त्रिसूत्रे अंगीकारली पाहिजेत - डॉ.दत्ता देशकर

केज/प्रतिनिधी

भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रमुख कणा हा शेती आहे.आणि ती प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर चालते.देशात पर्जन्यामध्ये अनिश्चितते चे प्रमाण जास्त आहे. पूर्वी सत्तर ते ऐंशी दिवस पाऊस पडायचा, आता तो चाळीस ते पन्नास दिवसातच पडतोय याचा अर्थ पडलेला पाऊस जमिनी मध्ये न मुरता तो प्रचंड वेगाने वाहत आहे.खरे पाहता जेवढ्या पाण्याची मानवाला गरज आहे,त्याच्या दुप्पट पाणी निसर्ग देत आहे,परंतु चुकीच्या व्यवस्थापनेमुळे तसेच जल निरक्षरतेमुळे आपली गरज पूर्ण होत नाही.यावर उपायम्हणून जिथे पाऊस पडतो तेथेच तो जिरवला पाहिजे,शेताचे तुकडे करून उतारानुसार पाणी पोंहोचवले पाहिजे.पाण्याचा प्रत्येक थेंब अमृता सारखा पवित्र मानला तरच पाणी प्रश्न सुटू शकतो.अन्नाच्या गरिबी पेक्षाही पाण्याची गरिबी असणे ही त्याराष्ट्रासाठी फार मोठी शोकांतिका आहे.आज चुकीच्या व्यवस्थापनामुळे फार मोठ्या प्रमाणात जल प्रदूषण होत आहे. सांडपाणी दुरावस्थेत सोडल्यामुळे शुद्ध पाणी अशुद्ध बनत आहे. मानवाच्या चुकीच्या कृतीमुळे जवळपास ९० टक्के पाणी वाया जात आहे.अर्थात शुद्ध पाण्याचे अशुद्धपाण्यात रूपांतर करणाऱ्यास मानव म्हणतात.तेंव्हा वेळीच पाण्याची महत्त्व जाणले पाहिजे,कारण जलसाक्षरता ही काळाची गरज आहे, तेंव्हा पाण्याचे संकलन, व्यवस्थापन व गुणवत्ता ही त्रिसूत्रे प्रत्येकाने अंगीकारली पाहिजेत. असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील जलतज्ञ डॉ.दत्ता देशकर यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि.२४ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाले चे पाचवे पुष्प गुंफण्या साठी प्रमुखवक्ते म्हणून डॉ.श्री.दत्ता देशकर, जलतज्ञ तथा निवृत्त प्राचार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून श्री. अनिकेत लोहिया, कार्यवाह,मानवलोक अंबेजोगाई हे उपस्थित होते.याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष, अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजिलोद्दीन काजी, नारायण अण्णा अंधारे, प्राचार्य शंकर भैरट, शाळेच्यामुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्रा.वि.चे मु.अ.वसंतराव शितोळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी लाभलेल्या उपस्थित पाहुण्यांचा परिचय मेघशाम मंगरूळकर यांनी दिला.पाचवे पुष्प गुंफतान चला जल साक्षर होवूया या विषयावर बोलताना डॉ. दत्ता देशकर पुढे म्हणाले की,जल व्यवस्थापन करत असताना आपल्या कार्याची दिशा योग्य असावी.याप्रसंगी त्यांनी शिरपूर तालुक्यातील एका सूतगिरणीचे उदाहरण सांगितले,ते म्हणाले की,त्या सूत गिरणीतून होणाऱ्या नफ्याचा एका हिस्सा ते या



कामासाठी खर्च करतात.त्यातआवश्यक ती यंत्रसामुग्री जसे पोकलेन,जेसीबी,डंपर्स इत्यादींची खरेदी केली जाते.व त्याच्या सहाय्याने खानापूरकर नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण आणि बंधारे बांधणे हे काम करतात. आता पावेतो शिरपूर तालुत्यातील ५४ गावांचे काम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी ४१ कोटी रुपये खर्च करुन १७७ बंधारे बांधल्या गेले आहेत.जमलेल्या पाण्यामुळे ८२५९ हेक्टर क्षेत्र पाण्याखाली आहे आहे.शिरपूर तालुक्यात १४९ गावे आहेत.त्या सर्व गावात ही योजना राबविली जाणार आहे.अजूनही जवळपास ३०० बंधारे नव्याने बांधलेजाण्याची शक्यता आहे.अशा विविध प्रसंगातून डॉ. दत्ता देशकर यांनी आपण जलसाक्षर होणे,हे कशाप्रकारे काळाची गरज आहे. याची जाणीव उपस्थित श्रोत्यांना करून दिली. शेवटच्या सत्रात, जलोपासना,जलसाक्षरते साठी जनजागरण हे पुस्तक त्यांनी उपस्थित सर्व श्रोत्यांना जनजागृतीसाठी मोफत वाटप केली.

अध्यक्षीय समारोपात श्री.अनिकेत लोहिया म्हणाले की,आजच्या व्याख्यानमालेचा विषय फार जटिल आहे.आज महाराष्ट्रामध्ये कमी वेळेत जास्त पाऊस पडत आहे,तेंव्हावाहत्या पाण्याचा उपयोग शेती साठी फारसा होतनाही. कारण वेगाने वाहणारी पाणी जमिनीमध्ये मुरत नाही,त्यामुळे भूजल साठ्याची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे, त्यासाठी आज विविध संस्था संघटना विविध परीने कार्य करत आहेत.त्यामध्ये नाम फाउंडेशन,भारतीय जनसंस्था,मानवलोक संघटना इत्यादी.या प्रसंगी त्यांनी इस्त्राईल या देशाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेती क्षेत्रात नवनवीन संशोधन केले. आज संपूर्ण जगतातील शेतकरी हे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी या देशांमध्ये जात आहेत.पुढे त्यांनी कर्नाटक प्रदेशातील शेतकऱ्यांनी कशाप्रकारे जलव्यवस्थापन करून पुढील किमान नऊ वर्षांचा पाणी प्रश्न सोडवला आहे,या विषयीचे विवेचन केले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन महादेव गिरी यांनी केले तर आभार रघुनाथ चौरे यांनी मानले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).